## प्रेस नोट

## मुरमाडी हत्याकांड तपास सीबीआयकडे

जा.क्र. ५७४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१६/०९/२०१६

दिनांक १४/०२/०१३ ला मौजा मुरमाडी येथील सदर घटना पोलीस स्टेशन लाखनी जिल्हा भंडारा अंतर्गत मौजा मुरमाडी येथील असुन १) कुमारी तणुजा जयपाल बोरकर वय ११ वर्ष, २) कुमारी प्राची जयपाल बोरकर वय ०९ वर्ष, ३) कुमारी प्रिया जयपाल बोरकर वय ०६ वर्ष, रा. मुरमाडी हया दिनांक १४/०२/२०१३ ला १०.३० वा. सुमारास घरुन शाळेत गेल्या परंतु सायंकाळी घरी परत न आल्याने त्यांचे शोध त्याचे नातेवाइक आई, आजोबा,आजी, यांनी सुरू केला परंतु त्या मिळुन न आल्याने मुलींचे आजोबा श्री. रायभान गणपत बोरकर रा. मुरमाडी यांनी दि. १४/०२/०१३ ला पोलीस स्टेशन लाखनी येथे १०.०० वा. सुमारास तिन्ही मुली गुम झाल्याची तक्रार दिली त्या तक्रारीवर पो. स्टे. लाखनी येथे गुम रजिस्टर नोंद क्रमांक क्रमशा ०४/२०१३, ०५/२०१३, ०६/२०१३ प्रमाणे नोंद करुन पो.उप.नि बरैया पोस्टे लाखनी यांनी सरद मुलीचा शोध घेणे सुरु केले होते.

गुम मुलींचा शोध सुरु असतांनी दि. १६/०२/२०१३ ला तिन्ही मुलीचे प्रेत श्री. प्रभाकर बाबुराव चोले रा. मुरमाडी यांचे गडेगाव शेत शिवारातील विहरी मध्ये १७.२० वाजता दरम्यान पाण्याचे वर तरगतांनी मिळुन आल्याने श्री. प्रभाकर बाबुराव चोले रा. मुरमाडी यांचे तक्रारी वरुन पो. स्टे. लाखनी येथे मर्ग क्रमांक ११/२०१३ कलम १७४ जा.फौ. प्रमाणे नोंद करण्यात आला सदर मर्गचा तपास श्री. प्रकाश मुंडे ठाणेदार लाखनी यांनी स्वत:कडे घेतला व लगेच सदर मर्गचा तपास श्री. संतोष कुंभारे उपविभागीय पोलीस अधिकारी पवनी कॅम्प लाखनी यांनी स्वत:कडे घेतला.

सदर मर्ग मधील मृतक तिन्ही मुलीचे शवविच्छेदन सामान्य रुग्णालय भंडारा येथे ५ वैदयकीय अधिकारी यांचे हस्ते दिनांक १७/०२/२०१३ ला करण्यात आले होते. वैदयकीय अधिकारी सामान्य रुग्णालय भंडारा यांनी तिन्ही मुलीचे शवविच्छेदन अहवाल दि. १८/०२/२०१३ ला दिल्याने मर्गचे तपास व शवविच्छेदन अहवालावरुन श्री. संतोष कुंभारे उपविभागीय पोलीस अधिकारी कॅम्प लाखनी यांनी स्वत: फिर्यादी होवुन पोस्टे लाखनी येथे अज्ञात आरोपी विरुध्द अप क्र. ४०/२०१३ कलम ३७६,३०२,२०१ भांदवि सहकलम ४ व ६ बलत्कारांचे लैगिंक अत्याचारापासुन संरक्षण कायदा २०१२ प्रमाणे नोंद करुन सदर गुन्हयांचा तपास सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी साकोली श्री. डॉ. अभिनव देशमुख (IPS) यांनी केला. त्या नंतर चा तपास श्री. हिमत एच. जाधव उपविभागिय पोलीस अधिकारी साकोली यांनी केला. असुन सदर गुन्हयाचा तपास सध्या मोहनदास एन. संख्ये उपविभागिय पोलीस अधिकारी साकोली यांचे कडे होता.

सदर गुन्हयांचा तपास शासनाचे आदेशानुसार सीबीआय/एस.सी.बी. मुंबई यांचे कडे दिनांक १५/०९/२०१६ ला पुढील तपास कामी हस्तांतरीत करण्यात आला आहे.

(श्री.पी.पी. कोलवाडकर)
प्रभारी पोलीस अधिकारी करीता
भंडारा.
दुरध्वनी.क्र.९४२३११९२९०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.